# समर्थित निर्णय पद्धतीसाठी मार्गदर्शिका

सेवा प्रदात्यांकरिता

**विकसित द्वारे**

India Mental Health Observatory

**समर्थित द्वारे**

Thakur Family Foundation

This work is licensed under Attribution-NonCommercial-NoDerivatives 4.0 International. To view a copy of this license, visit: http://creativecommons.org/licenses/by-nc-nd/4.0

# अनुक्रमणिका

.................................................................................................................................

हे मार्गदर्शक कशासाठी? .......................................................... 4

महत्त्वपूर्ण  संज्ञा.......................................................... 6

निर्णय घेणे म्हणजे काय? .......................................................... 7

गुंतागुंतीचे निर्णय.......................................................... 8

समर्थित निर्णय घेणे म्हणजे काय? .......................................................... 10

समर्थित निर्णय पद्धतीची तत्वे .......................................................... 17

समर्थित निर्णय घेण्यासाठी सेवा प्रदाता यांनी अनुसरायचे धोरण .......................................................... 20

**धोरण १: शिक्षकाची भूमिका घ्या.** .......................................................... 20

**धोरण 2: विषय  सोपे करा.** .......................................................... 20

**धोरण 3: सर्जनशील व्हा.** .......................................................... 20

**धोरण 4: भाषा बदला.** .......................................................... 21

**धोरण 5: स्पष्टीकरणासाठी वेळ द्या.** .......................................................... 21

**धोरण 6: स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांना प्रोत्साहन द्या.** .......................................................... 21

**धोरण 7: समर्थक व्हा.** .......................................................... 22

व्यवहारात समर्थित निर्णय घेणे .......................................................... 23

## आभार

हार्वर्ड स्कूल ऑफ लॉ मधील सुश्री एरियल सिम्सने तिच्या CMHLP मधील इंटर्नशिपच्या दरम्यान CMHLP साठी या मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा तयार केल्याबद्दल आम्ही तिचे आभार मानू इच्छितो.

## इंडिया मेंटल हेल्थ ऑब्झर्वेटरी

(IMHO)

IMHO हा CMHLP चा एक उपक्रम आहे. IMHO ही मानसिक स्वास्थ्यावरील डेटा (प्राथमिक स्वरूपातील माहिती) आणि माहितीचा संग्रह आहे, ज्याआधारे मानसिक प्रगतीसाठी पुरावा-आधारित धोरण बनविता येईल आणि सद्य स्थितीतील त्रुटी भरून काढून मानसिक स्वास्थ्याला प्रोत्साहन देता येईल. IMHO चे ध्येय भारतात न्याय्य, सुलभ ,स्वस्त, दर्जेदार आणि अधिकारांवर आधारित मानसिक आरोग्यसेवेतून मानसिक आरोग्याचे परिणाम सुधारणे हे आहे. IMHO ला ठाकूर फॅमिली फाउंडेशनने पाठिंबा दर्शविला आहे.

## Centre for Mental Health Law and Policy

2007 मध्ये स्थापित, CMHLP पुणे येथील ILS हा सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, जो १९२४ मध्ये संस्थापित झाला, तिथे स्थित आहे. CMHLP चे लक्ष्य मानसिक आरोग्यासाठी हक्कांवर आधारित दृष्टीकोन वापरुन मनोसामाजिक अक्षमता असणाऱ्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि संवंर्धन करणे आहे. आम्ही यासाठी विविध भागधारक जसे स्वतः मनोरुग्ण, काळजीवाहू, मानसोपचार तज्ञ, धोरणकर्ते, नागरी संस्था आणि संशोधक यांच्याबरोबर काम करतो. आम्ही विशेषतः अल्प-मध्यम उत्पन्न देशातील (LMIC) असुरक्षित आणि उपेक्षित जनतेबरोबर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करतो

# हे मार्गदर्शक कशासाठी?

हे मार्गदर्शक मनोसामाजिक अक्षम लोकांच्या (PwPD) काळजीवाहूंना दैनंदिन जीवनात आणि PwPD बरोबरच्या संबंधात समर्थित निर्णय समाविष्ट करण्यात मदत करण्यासाठी आहे. समर्थित निर्णय ("SDM- Suported Decision Making") म्हणजे स्वत: च्या आयुष्याबद्दल, वेगवेगळ्या स्तरावर आधार किंवा मदत घेऊन स्वायत्त निवडी करणे किंवा निर्णय घेणे - जे सर्व लोक दैनंदिन जीवनातील विविध परिस्थितींमध्ये करतात.

भारतासह जगाच्या बऱ्याच भागात समर्थित निर्णय पद्धती व्यावहारिकदृष्ट्या राबविली जात नाही, विशेषत: अपंग व्यक्तींच्या बाबतीत किंवा PwPD च्या बाबतीत. त्याऐवजी, बहुतेक देश पर्यायी निर्णयपद्धतीचा वापर करतात ज्यामध्ये PwPD च्या वतीने, बऱ्याचदा त्या व्यक्तीला संधी दिल्याशिवाय पालक, काळजीवाह सेवा प्रदाता किंवा कायदेशीर पालक निर्णय घेतात. यामध्ये काही अगदी सोप्या गोष्टी म्हणजे काय परिधान करावे यापासून काही जटील गोष्टी - जसे विशिष्ट मानसिक आरोग्य उपचार मिळवायचे की नाही, उदाहरणार्थ विद्युताघात उपचार पद्धती (“ECT”) यांचा समावेश असतो.

ह्यापलीकडे, मानसिक आरोग्य व्यावसायिक, सेवा प्रदाता आणि काळजीवाहू अनेकदा PwPD बद्दल ते अतार्किक, अवास्तव किंवा निर्णयक्षमतेचा अभाव असलेले अशा पूर्वग्रहाने पाहतात. गंभीर मानसिक आरोग्याच्या समस्या असलेल्या लोकांना त्यांच्या स्थितीमुळे त्यांच्या स्वतःच्या जीवनाबद्दल निर्णय घेणे शक्य नाही असा गैरसमज प्रचलित असतो. याचा परिणाम म्हणून PwPD ना स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य वापरण्याचा आणि त्यांच्या स्वत: च्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याचा हक्क नाकारला जातो. हे स्वायत्तता व स्वेच्छा ह्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे.

पर्यायी निर्णय घेण्याचा उपयोग - अपंग व्यक्तींचे गैरवर्तन आणि दुर्लक्ष होण्यापासून संरक्षण करणे अशा चांगल्या हेतूने केला जातो - बहुतेकदा कुटुंबातील सदस्य, काळजीवाहू आणि सेवा प्रदाता त्यांच्या दृष्टीने PwPDच्या हिताचे निर्णय घेतात पण असे करताना PwPD ची इच्छाशक्ती आणि प्राधान्यांचा विचार केला जात नाही, त्याऐवजी त्यांच्यासाठी दुसऱ्या व्यक्तीला 'सर्वोत्कृष्ट' वाटणाऱ्या गोष्टींवर निर्णय घेतला जातो.

समर्थित निर्णय पद्धती PwPD व्यक्तींसाठी त्यांचे स्वातंत्र्य आणि कायदेशीर क्षमता टिकवून ठेवण्यास मदत करते. समर्थित निर्णय पद्धती ह्या प्रमाणामुळे राष्ट्रे निर्णय घेणे हा हक्क घोषित करून ,आणि त्यातील कायदेशीर पालकत्वाखालील पर्यायी निर्णयाची सोय बंद करून मानवी हक्कांच्या कर्तव्याची पूर्तता करतात.

संयुक्त राष्ट्राची दिव्यांग मानवी हक्क परिषद ("CRPD – Convention of Rights of Person with Disabilities") आणि भारताचा Mental Healthcare Act 2017 (MHCA 2017 -मानसिक आरोग्य सेवा कायदा) ह्यामध्ये समर्थित निर्णय पद्धतीच्याा आदेशचा समावेश आहे. CRPD च्या मार्गदर्शक तत्वांमध्ये स्वायत्तता आणि स्वातंत्र्य, सन्मान आणि भेदभाव न करणे, समाजात सहभाग आणि समावेश आणि समानता आणि मानवी विविधतेबद्दल कृतज्ञता हक्क यांचा समावेश आहे. समर्थित निर्णय पद्धती PwPD च्या निर्णय प्रक्रियेत ही तत्त्वे समाविष्ट करण्याच्या अनेक मार्गांपैकी एक आहे. हे मुख्यत्वे CRPDच्या अनुच्छेद 12 पासून प्राप्त झाले आहे. त्यानुसार अपंग व्यक्तींना कायद्यासमोर इतर व्यक्तींप्रमाणेच समान मान्यता मिळते. अपंगांच्या हक्कांवर काम करणाऱ्या समितीच्या मते - जी देश ह्याचे पालन करतात का ह्याची देखरेख करण्यासाठी जबाबदार आहे - सनद १२ नुसार समर्थित निर्णय हे आरोग्यसेवा आणि उपचार ह्यासकट जीवनातील सर्व क्षेत्रात आवश्यक आहेत.

MHCA 2017 नुसार भारतात काळजीवाहू, मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांना मानसिक आरोग्य सेवा आणि उपचार प्रदान करताना PwPD साठी समर्थित निर्णय पद्धतीच्या अंमलबजावणीची खात्री करणे बंधनकारक आहे. तथापि, एसडीएम सामान्यत: भारतात वापरल्या जात नसल्याने, या मार्गदर्शकाचे लक्ष्य काळजीवाहकांना एसडीएम म्हणजे नक्की काय हे समजावणे आणि पीडब्ल्यूपीडीना स्वायत्त निर्णयक्षमतेसाठी आवश्यक तंत्रांनी सुसज्ज करायला मदत करणे हे आहे

## सारांश

| | | |
|---|---|---|
| वेगवेगळ्या पातळीच्या आधार किंवा मदतीने स्वायत्त निवड किंवा निर्णय घेणे - जे आपण सगळे दैनंदिन जीवनात करतो | आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कायदा असूनही भारतात मानसिक समस्या असणाऱ्यांसाठी समर्थित निर्णय पद्धतीची अंमलबजावणी नाही | हे मार्गदर्शक सेवा प्रदात्यांना समर्थित निर्णय पद्धती समजून घेऊन दैनंदिन जीवनात PwPD चे समर्थन करायला धोरण प्रस्थापित करायला मदत करेल |

# महत्त्वपूर्ण संज्ञा

**PwPD (मनोसामाजिक अक्षम): मानसिक** आजारपण किंवा मानसिक आरोग्याच्या समस्या असणारी व्यक्ती, जी त्यांच्या सभोवतालच्या वातावरणातील विविध अडथळ्यांमुळे दैनंदिन आयुष्यांत इतरांप्रमाणे भाग घेण्यास असमर्थ आहे

**निर्णय घेणे:** एखादी गोष्ट माहित करून घेण्याची, तिचे परिणाम समजण्याची आणि स्वतःची निवड आणि पसंती व्यक्त करण्याची प्रक्रिया

**क्षमता:** एखाद्याच्या जीवनावर परिणाम घडविणाऱ्या गोष्टींविषयी निर्णय घेण्याची क्षमता. क्षमतेत तीन भिन्न क्षमता समाविष्ट आहेत: (i) निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती समजून घेण्याची क्षमता (ii) संभाव्य निर्णयाचे वाजवी परिणाम समजून घेण्याची क्षमता आणि (iii) आपण घेतलेला निर्णय दुसऱ्यांपर्यंत पोचवण्याची क्षमता

**कायदेशीर क्षमताः** हक्क असण्याचा आणि असे हक्क वापरून कायदेशीर निर्णय घेण्याबद्दलची कायदेशीर स्थिती

**व्यक्तित्व :** विचार, भावना, ध्येय आणि स्वेच्छा असणारी स्वतंत्र व्यक्ती म्हणून मान्यता

**पर्यायी निर्णय:** निर्णय घेण्याची पद्धत ज्यामध्ये एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीसाठी, जिला निर्णयक्षमता नाही असे गृहीत धरले आहे, निर्णय घेते

**पालकत्व:** पर्यायी निर्णयाचा पारंपारिक स्वरूप ज्यायोगे पालक, पर्यायी पालक किंवा कोर्टाने नियुक्त केलेली व्यक्ती दुसऱ्याच्या, सहसा मानसिक किंवा बौद्धिक असमर्थता असणाऱ्या व्यक्तींच्या वतीने निर्णय घेते

**समर्थित निर्णय घेणे:** स्वतःच्या आयुष्याबद्दल विविध स्तराच्या मदतीने निवड करणे किंवा निर्णय घेणे - जे आपण कायम विविध दैनंदिन नित्याच्या परिस्थितीत करतो. मानसिक स्वास्थ्याच्या संदर्भात, असा आधार PwPD ना विश्वासातल्या व्यक्तीकडून, विशेष तंत्रज्ञानामधून किंवा कायदेशीर साधनांमधुन मिळू शकतो - जे निर्णय घेणे अवघड असताना त्यांचे प्राधान्य व्यक्त करायला मदत करतात

**अडव्हान्स डायरेक्टिव्ह:** भविष्यातील घटनेच्या तयारीसाठी बनविलेले वैयक्तिकृत उपचार योजना. PwPD, जर भविष्यात मानसिक अस्वास्थ्यामुळे स्वतःला निर्णय घेता आले नाहीत तर अशा वेळेसाठी आधीच उपचार प्राधान्य व्यक्त करण्यासाठी आगाऊ निर्देश वापरू शकतात

**नियुक्त प्रतिनिधी:** कोणीही व्यक्ती (पालक, जोडीदार, भावंडं, मित्र किंवा व्यावसायिक) ज्यावर PwPD चा विश्वास आहे आणि ज्याची PwPD ने मानसिक आरोग्याबद्दल प्रतिनिधित्व करायला आणि निर्णय घेण्यात साहाय्य करायला निवड केली आहे

# निर्णय घेणे म्हणजे काय?

आपण सर्व वेळोवेळी निर्णय घेत असलो तरी आपल्यापैकी बरेचजण कधीच हे निर्णय आपण कसे घेतो याचा विचार करत नाहीत. निर्णय घेण्याची प्रक्रिया खूप सोपी वाटते. "हा निर्णय आपण कसा घेतला" ह्याचा विचार न करता आपण दररोज शेकडो निर्णय  घेत असतो

तुम्हाला मोटरसायकल खरेदी करायची आहे पण कोणते मॉडेल सर्वोत्तम आहे याची खात्री नाही. आपण आपल्यासाठी योग्य अशी काही मॉडेल्स पहाता , कुटुंब आणि मित्रांचा सल्ला घेता आणि आपण विचार करत असलेल्या मॉडेलवर आपल्या मेकॅनिकशी गप्पा मारता. निवडींबाबत अधिक संशोधन आणि माहिती जमा करून कुटुंब, मित्र आणि मेकॅनिक कडून उपलब्ध झालेल्या सल्ल्यांवरून आपण मोटारसायकल B खरेदी करण्याचा निर्णय घेता.

तुम्हाला टीव्ही खरेदी करायचा आहे परंतु टीव्हीच्या सध्या बाजारात उपलब्ध आहेत प्रकारांशी तुम्ही परिचित नाही. तुमचा एक चांगला मित्र टीव्हीच्या दुकानात  काम करतो आणि त्याला आपल्या पसंतीची चांगली जाण आहे. त्याच्याशी सल्लामसलत केल्यावर तो विविध उपलब्ध पर्यायांबद्दल सांगतो - हाय डेफिनेशन, फ्लॅट स्क्रीन, इ. तुमच्या आवडीनिवडींवर उपलब्ध असलेले पर्याय जाणून घेणे, तुमच्या मित्राने सुचवलेल्या चार पर्यायांपैकी एक पर्याय - D तुम्ही निवडता

वरील प्रसंगातील मोटारसायकल किंवा टीव्ही खरेदीचे निर्णय हे दैनंदिन जीवनात आपण सगळेच इतरांच्या आधाराने निर्णय कसे घेतो ह्याचे उदाहरण आहे. ज्यात जरी आपण इतरांनाच सल्ला घेतला तरी अंतिम निर्णय आपली इच्छा आणि प्राधान्य ह्यावर अवलंबून असतात. निर्णय घेण्याची प्रक्रिया तीन टप्प्यात विभागता येतेः

*आकृती 1*: **निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील पायऱ्या**




### चरण १. माहिती आणि संदर्भ समजून घेणे

कुठलाही निर्णय घेण्यासाठी माहिती आणि संदर्भ असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ परिधान करण्यासाठी कपडे निवडताना हवा कशी आहे आणि त्या दिवसाचे नियोजित उपक्रम काय आहेत हे माहित असणे उपयुक्त आहे. हवामान अंदाजाच्या अनुषंगाने योग्य पोशाख निवडण्यास मदत होते आणि नियोजित उपक्रम ही निवड करण्यासाठी योग्य संदर्भ पुरवतात. कामाला जातानाच्या पोषाखाची निवड ही सामाजिक मेळाव्याला जायच्या निवडीपेक्षा वेगळी असू शकते

### चरण 2: परिणाम समजून घेणे

एकदा निर्णयाच्या अनुषंगाची माहिती आणि संदर्भ समजला की  निर्णयाचे कंगोरे - जसे राखाडी स्वेटर घालायचा की  पिवळा हे ठरवावे लागते. रंगाची निवड हा एकच विचार करून चालत नाही त्यासंबंधित निगडित इतर बाबीही असू शकतात. उदाहरणार्थ राखाडी आणि पिवळा दोन्ही रंग योग्य आहेत. पण पिवळ्या स्वेटर ला जास्त मोठे खिसे आहेत. पिवळ्या स्वेटरची निवड केली तर तुम्ही तुमचे पाकीट, किल्ल्या आणि फोन सुद्धा त्यात ठेऊ शकता आणि राखाडी स्वेटर घातला तर पाकीट, किल्ल्या आणि फोनसाठी वेगळी पिशवी घ्यावी लागेल.

### चरण 3: निवडीवर कृती

राखाडी किंवा पिवळा स्वेटर परिधान करण्याचे फायदे आणि तोटे विचारात घेऊन तुम्ही राखाडी स्वेटर घालण्याचा निर्णय घेता कारण आपले सामान आपल्या खिशात ठेवण्यापेक्षा वेगळ्या पिशवीतुन  नेणे तुम्हाला अधिक सुरक्षित वाटते

## गुंतागुंतीचे निर्णय

प्रत्येक निर्णय हा कमीअधिक  गुंतागुंतीचा किंवा महत्त्वाचा असतो. काही निर्णय खूप सोपे असतात जसे की पोशाख निवडणे. इतर निर्णय अधिक क्लिष्ट असतात किंवा त्यांचे परिणाम महत्वाचे असू शकतात  - जसे की वैद्यकीय उपचार निवडणे. एखाद्या व्यक्तीला निर्णय घेण्यासाठी लागणारा आधार हा ती व्यक्ती आणि निर्णयाची क्लिष्टता ह्यावर अवलंबून असतो. क्लिष्ट निर्णयांसाठी माहिती मिळवणे, निर्णयांचे परिणाम समजून घेणे आणि निर्णयासाठी योग्य समर्थन मिळवणे यासाठी जास्तही वेळ लागतो. हे विशेषतः मानसिक स्वास्थ्याच्या संदर्भात खरे आहे. प्रत्येकाची माहिती जमवण, परिणाम समजून घेणे, संवाद साधणे आणि निर्णयावर कृती करणे ह्याची क्षमता वेगळी असल्याने निर्णय घेणे ही एक प्रक्रिया असू शकते. पुढील उदाहरणाचा विचार करा

सोनू आणि रूप दोघांनाही कॅन्सरचे निदान झाले आहे. सोनू डॉक्टर आहे, तिची स्थिती आणि उपचारांचे उपलब्ध पर्याय तिला चांगले समजतात. रूप हे  डॉक्टर नाहीत आणि त्यामुळे झालेले निदान त्याला तितके व्यवस्थित समजत नाही. उपचाराचा मार्ग ठरवताना, सोनू तिच्या डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्वरित निर्णय घेऊ शकते पण रुपला त्याच्या स्थितीबद्दल आणि उपचारांच्या परयाबद्दलजाणून घेण्यासाठी अधिक वेळ लागेल. रूपला त्यांच्या  डॉक्टरांशी बोलण्यात जास्त वेळ घालवायला आवडेल ज्यामुळे तो कुठले उपचार करायचे ह्याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकेल. अखेरीस सोनू आणि रूप दोघेही स्वायत्त आणि माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकतात, जरी निर्णय घेण्याची प्रक्रिया सोनूच्या तुलनेत रूप साठी जास्त कठीण आणि वेळ घेणारी असेल.

कधीकधी रूपप्रमाणे, आपल्या सर्वांनादेखील माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी अधिक वेळ आणि मदतीची आवश्यकता भासू शकते. गरजेनुसार आधार मागितल्याने आपल्याला अधिक माहितीपूर्ण निर्णय घेता येतात. निर्णय घेताना कितीही मदत लागली तरी अंतिम निर्णय आपण स्वायत्तपणे स्वतंत्र व्यक्ती म्हणून करतो. निर्णय घेण्याची प्रक्रिया ही ि बरेचदा (किंबहुना नेहमीच) भावनांनी प्रभावित होऊन अजून क्लिष्ट होऊ शकते . बहुतेक वेळा निर्णय घेणे हा तार्किक किंवा तर्कशुद्ध अभ्यास मानला जाऊ शकत नाही. किंबुहना, तर्कहीन किंवा वाईट निर्णय घेणे हा मानवी अस्तित्वाचा एक भाग आहे.

## SUMMARY

| | | |
|---|---|---|
| काही निर्णय खूप सोपे असतात , जसे की परिधान करण्यासाठी कपड निवडणे. इतर निर्णय जास्त क्लिष्ट महत्वाचे आणि महत्वाच्या परिणामाचे असू शकतात जसे वैद्यकीय उपचार निवडणे | एखाद्या व्यक्तीला निर्णय घेण्यासाठी लागणारी मदत ही<br>त्या व्यक्तीवर आणि निर्णयाच्या क्लिष्टतेवर अवलंबून असते. | भावना, अनुभव आणि उद्देश ह्यांचा आपल्या निर्णयांवर प्रभाव होत ो |

# समर्थित निर्णय घेणे म्हणजे काय?

पूजाला स्किझोफ्रेनिया आहे. योग्य पोषाखाची निवड करण्याचे निर्णय तिला अस्वस्थ करतात. जेव्हा तिची आई तिला कपडे निवडण्यास सांगते पूजाला चिंताग्रस्त आणि अस्वस्थ वाटते. पूजाला तिच्या पोशाख निवडण्याच्या निर्णयात पाठिंबा देण्यासाठी तिची आई पोशाख निवडण्याची प्रक्रिया लहान  टप्प्यांमध्ये विभागते. ती पूजाला विचारते की तिला कोणता रंग घालायला आवडेल. पूजाच्या उत्तरावर आधारित तिची आई त्या रंगाचे सर्व पोशाख पुजासमोर मांडते. पूजा मग त्यापैकी तिला काय आवडेल ते निवडते. निर्णय घेण्याची प्रक्रिया लहान टप्प्यांमध्ये विभागून पूजाची आई पूजाला तिच्या प्राधान्याप्रमाणे निर्णय  घेण्यास मदत करते.

## 1. समर्थित निर्णय पद्धती

दैनंदिन निर्णय घेणे हे माहिती आणि परिणाम समजून घेणे आणि निवडीतुन प्राधान्य व्यक्त करणे ह्याची प्रक्रिया आहे. काही वेळा या प्रक्रियेत इतरांकडून समर्थन मागण्याची गरज लागू शकते. मागील उदाहरणांमधून व्यक्त केल्याप्रमाणे समर्थित निर्णय हे नेहमीच्या  निर्णय घेण्यासारखेच आहे, फक्त काहीवेळा एखाद्याला निर्णय घेण्यासाठी आणि ते व्यक्त करण्यासाठी विशिष्ट मदतीची गरज लागू शकते. उदा. PwPD साठी कायदेशीर साधनांचा वापर, विश्वसनीय व्यक्ती किंवा सहाय्यक व्यक्ती खालील उदाहरण स्पष्ट करते की एखाद्या PwPD साठी समर्थित निर्णय पद्धती कशी असू शकते.

## 2. सर्वोत्तम स्वारस्

पर्यायी निर्णय पद्धती सहसा "सर्वोत्तम हितसंबंध " या तत्त्वावर कार्य करते. ज्यामध्ये मानसिक आजार असणाऱ्या व्यक्तीच्या वतीने निर्णय घेणारी व्यक्ती त्यांना त्या व्यक्तीच्या वाटणाऱ्या "सर्वोत्तम हित" ह्यावर अवलंबून निर्णय घेते. खालील उदाहरणाचा विचार करा:

राजुल ही श्रवणदोष असलेली व्यक्ती आहे. ती  तिच्या  मावशीबरोबर राहते, जी तिची  कायदेशीर पालक देखील आहे. राजुलने शिक्षण संपल्यावर नोकरी करण्याऐवजी  घरीच राहणे चांगले असा मावशीचा विश्वास आहे. राजुलला मात्र शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी शोधण्याऐवजी मुलांबरोबर काम करायला आवडेल.

राजूलला गंभीर मानसिक आरोग्य समस्या आहे. तिच्या पालकांना वाटते की राजुलला उपचारांची आवश्यकता आहे अन्यथा तिची स्थिती अधिकच बिघडेल. त्यांनी राजूलला उपचारासाठी तिच्या संमतीशिवाय रुग्णालयात दाखल केले कारण त्यांना वाटते की  रुग्णालयात उपचार मिळवणे हे तिच्या हिताचे आहे. राजुलला रुग्णालयात दाखल व्हायची इच्छा नाही, तिला घरीच  उपचार करणे पसंत आहे. पर्यायी निर्णय घेण्याच्या दृष्टिकोनातून राजूलचे पालक तिच्या इच्छेविरूद्ध  तिला लवकर बरे वाटावे म्हणून रुग्णालयात दाखल करण्याचा  निर्णय घेऊ शकतात.

अशा प्रकारे, दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने त्यांच्या "सर्वोत्तम हितासाठी" निर्णय घेणे हे त्या व्यक्तीच्या प्रत्यक्षात इच्छेच्या विरुद्ध जाऊ शकते. एक "सर्वोत्तम हित" निर्णय हा व्यक्तीच्या इच्छा आणि प्राधान्यांशी संघर्ष करू शकतो आणि त्यांना स्वतःचे निर्णय घेण्याच्या अधिकारापासून वंचित करू शकतो.


## 3. इच्छा आणि प्राधान्य

दैनंदिन जीवनात लोक अनेक पर्यायांची निवड करतात. कुठला पोशाख परिधान करावा, कुठे काम करावे, कधी आणि कोणत्या प्रकारचा उपचार एखाद्या आजारासाठी घ्यावा वगैरे. या निवडी करताना लोकांचा निर्णय ( PwPD सकट) त्यांच्या प्राधान्यावर आधारित असतो, जसे की त्यांना कोणता रंग आवडतो, त्यांना कोणते अन्न आवडते, त्यांच्यासाठी अर्थपूर्ण काम काय आहे आणि त्यांना कोणत्या प्रकारचे उपचार पसंत आहेत. समर्थित निर्णय पद्धतीनुसार PwPD द्वारे घेतलेला कोणताही निर्णय त्यांची इच्छा आणि प्राधान्य ह्यावर निर्धारित असणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीच्या इच्छा आणि प्राधान्य त्यांचे व्यक्तिमत्व, वैयक्तिक श्रद्धा, जीवनमान आणि त्यांना काय अर्थपूर्ण किंवा मौल्यवान वाटते ह्यावर अवलंबून आहेत.

मागील उदाहरणात समर्थित निर्णय घेण्याच्या दृष्टीकोनातून , राजूलने रुग्णालयात दाखल व्हायचे की नाही ( राजूलची इच्छा). आणि कुठल्या प्रकारचे उपचार घ्यायचे ( राजूलचे प्राधान्य) हे राजूल ठरवेल. या निर्णयासाठी राजूलला काही मदतीची गरज पडू शकते - उदाहरणार्थ, रुग्णालयात दाखल होण्याची गरज स्पष्ट करणे. रुग्णालयात प्रवेश घेण्याचे परिणाम आणि प्रवेश न घेतल्यास असणारे पर्याय, ह्या बाबतीत आवश्यक माहिती गोळा केल्यानंतर, कायदेशीर पालकांचा सल्ला ऐकून आणि निर्णयाचे परिणाम समजून घेणे, राजूल ठरवू शकते की रुग्णालयात दाखल व्हायचे की पर्यायी उपचारपद्धतीला प्राधान्य द्यायचे.

| SUMMARY | | |
|---|---|---|
| PwPD चे सेवा प्रदाते, कुटुंब सदस्य, मित्र, आणि सहकारी प्रदाते यांची जबाबदारी आहे क PwPD ना निर्णय घेण्यासाठी सर्व साहाय्य मिळते आणि त्यांच्या हितासाठी आपण निर्णय घेण्यापेक्षा त्यांची इच्छा आणि प्राधान्य याचा मान राखला जातो. | PwPDना इतर लोकांप्रमाणेच त्याचे निर्णय घेण्यासाठी मदत लागू शकते. मोठे निर्णय (उदा.,उपचार कधी घ्यावेत ) आणि लहान (उदा. काय परिधान करावे ). मदत किंवा समर्थनाची पातळी ही व्यक्ती आणि निर्णय कशाबद्दल आहे ह्यावर अवलंबून भिन्न असू शकते . | इच्छा आणि प्राधान्य हे नेहमीच "सर्वोत्तम हित" ह्यापेक्षा महत्वाचे आहेत. |


## 4. समर्थित निर्णय  घेण्याची उद्दिष्टे




**आकृती 2: समर्थित निर्णय पद्धतीचे उद्दिष्ट**

## 5. निर्णय घेण्याचे सातत्य

समर्थित निर्णय हे निर्णय घेण्याच्या प्रकारात  सातत्य आणते .  हा निर्णय घेण्याचा प्रकारातील सर्वाधिक स्वतंत्र प्रकार नाही, परंतु तो वैयक्तिक स्वायत्तता आणि स्वतःची दिशा निवडणे यास कमीत  कमी प्रतिबंधात्मक आहे. समर्थित निर्णय हे कोणतीही मदत किंवा समर्थन न घेता निर्णय घेणे आणि पर्यायी निर्णय घेणे, ज्याद्वारे व्यक्तीची निर्णय  क्षमता गणलीच जात नाही,  या दोन्हीच्या मध्ये येते.




## 6. मानसिक आरोग्य सेवा कायदा, 2017 अंतर्गत समर्थित निर्णयघेणे

**आकृती 3: निर्णय घेण्याचे सातत्य**

2017 मध्ये लागू मानसिक आरोग्य सेवा कायदा ("MHCA 2017") या हक्कांवर आधारित दृष्टिकोन स्वीकारतो. ह्या कायद्यानुसार मानसिक स्वास्थ स्वास्थ्य जपण्यासाठी , मानसिक आरोग्य आणि उपचारांचे नियमन करण्यासाठी समर्थित निर्णय पद्धती अनिवार्य आहे. MHCA 2017 क्षमता परिभाषित करत नाही परंतु कायद्याच्या कलम 4 (1) नुसार व्यक्तीला (PWPD सह) त्यांच्या मानसिक आरोग्य सेवा आणि उपचार याबाबत निर्णय घेण्याची क्षमता आहे असे मानले जाईल जर त्या व्यक्तीकडे खालील क्षमता असतील.

- निर्णय घेण्यासाठी गरज असणारी संबंधित माहिती जसे उपचार, रुग्णालय दाखला, वैयक्तिक समर्थन समजून घेणे, अशी माहिती त्या व्यक्तीला समजेल अशा सोप्या भाषेत किंवा सांकेतिक भाषेत अथवा दृश्य साधने(visual aids) किंवा इतर साधनां द्वारे दिली पाहिजे.
- निर्णयाच्या किंवा अनिर्णायाच्या उपचार, रुग्णायालयात दाखल होणे किंवा वैयक्तिक सहाय्य ह्यावर होणाऱ्या कोणत्याही वाजवी आणि अपेक्षित परिणामाची प्रशंसा करणे.
- • (I) भाषण (ii) अभिव्यक्ती (iii)हावभाव किंवा इतर कोणतेही साधन ह्या द्वारे निर्णय कळवता येणे.

हा कायदा समर्थित निर्णयाचा हक्क अधिनियमनाच्या द्वारे आणि आगाऊ निर्देश आणि नामांकित प्रतिनिधी अशा तरतुदींद्वारे प्रस्थापित करतो. ह्यामुळे PwPD त्यांच्या क्षमतेचा वापर करून स्वतःच्या मानसिक स्वास्थ्य आणि उपचार ह्याबद्दल इच्छा आणि प्राधान्य व्यक्त करू शकतात.

## आगाऊ निर्देश (एडी- AD – Advance Directive)

MHCA 2017 मधील तरतुदीनुसार १८ वर्षावरील प्रत्येक व्यक्तीला , ते PwPD आहेत की नाही याची पर्वा न करता, स्वत: साठी आगाऊ निर्देश करण्याचा अधिकार आहे. आगाऊ निर्देश ही ि एखाद्या व्यक्तीस मानसिक आजार झाला आणि उपचाराविषयी निर्णय घेण्याची क्षमता नसेल तर त्या व्यक्तीने मानसिक उपचारांबद्दल काय निर्णय घ्यावेत याविषयी एक लिखित घोषणा आहे. त्यांच्या आगाऊ निर्देशांमध्ये लोक उपचार, काळजी आणि लागणारे समर्थन निर्दिष्ट करु शकतात. याव्यतिरिक्त, ते कुठल्या प्रकारचे उपचार किंवा काळजी पर्याय नकोत किंवा त्यांना कसे वागवले जावे (किंवा न वागवले जावे) हेही निर्दिष्ट करू शकतात. अशा प्रकारे, आगाऊ निर्देश हे PwPD साठी मानसिक आरोग्य सेवा आणि उपचार त्यांच्या इच्छेनुसार आणि प्राधान्यांनुसार दिले जातील हे सुनिश्चित करतात. आगाऊ निर्देशाद्वारे व्यक्ती नामांकित प्रतिनिधींची नेमणूक करू शकतात.

आगाऊ निर्देश वैध मानले जाण्यासाठी ते नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. आगाऊ निर्देश वैध मानले जाण्यासाठी ते बंधित मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळ ("MHRB") यांच्याकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे . एकदा आगाऊ निर्देशांची नोंदणी झाली आणि उपचार सुरू करण्यापूर्वी मानसिक आरोग्य चिकित्सकांना आगाऊ निर्देशांची प्रत दिली गेली असेल तर त्यांना त्यानुसार उपचार प्रदान करणे बंधनकारक आहे. एकापेक्षा जास्त आगाऊ निर्देशांच्या प्रति असल्यास सगळ्यात नवीन निर्देश व्यक्तीच्या इच्छा आणि प्राधान्यासाठी वैध आणि प्रतिनिधीक मानला जाईल. अशी व्यक्ती परत सक्षम झाल्यावर आगाऊ निर्देश लागू होत नाही.

आगाऊ निर्देशाचे पुनरावलोकन केले जाऊ शकते किंवा मानसिक आरोग्य चिकित्सक/ व्यावसायिक , काळजी घेणारा किंवा नातेवाईक त्याला MHRB समोर खालील परिस्थितीत आव्हान देऊ शकतात.

i आगाऊ निर्देश व्यक्तीने त्यांच्या स्वत: च्या इच्छेने तयार केले नव्हते

ii आगाऊ निर्देश जारी केल्यापासून परिस्थितीत बदल आहे

iii निर्णय घेण्यासाठी त्या व्यक्तीस दिलेली माहिती अपुरी आहे

iv व्यक्तीकडे आगाऊ निर्देश तयार करताना मानसिक आरोग्यसेवा आणि उपचारांचा निर्णय घेण्याची निर्णय क्षमता नव्हती

v आगाऊ निर्देश कायदा किंवा घटनात्मक तरतुदीविरूद्ध आहे

वर नमूद केलेल्या निकषांवर एमएचआरबीच्या निष्कर्षानुसार आगाऊ निर्देश बदलले, सुधारित किंवा रद्द केले जाऊ शकतात.

ॲडव्हान्स डायरेक्टिव्हचे प्रारूप खाली दिले आहे:

## ॲडव्हान्स डायरेक्टिव्ह बनविणे, सादर करणे / पुन्हा बजावणे आणि रद्द करणे यासाठीचे फॉर्म

1. **नाव (फोटो ओळखीच्या कागदपत्रांच्या पुराव्याची प्रत जोडा):**
2. **वय ( 18 वर्षांपेक्षा जास्त वयाची वयाची प्रत जोडा):**
3. **वडिलांचे / आईचे नाव:**
4. **पत्ता (पुराव्याची प्रत जोडा):**

*(टीप: जन्माचा दाखला, वाहन चालविणे परवाना, मतदारांचे कार्ड, पासपोर्ट, आधार कार्ड इ. चा वैध ओळख पुरावा ॲड्रेस प्रूफ आणि वयाचा दाखला म्हणून मान्य.)*

5. **संपर्क क्रमांक:**
6. **मागील आगाऊ निर्देश नोंदणी क्र. (दुरुस्ती / रद्दबातल/ मागे घेणे भरल्यास.)**
7. **माझी अशी काळजी घ्यावी व असे वागवावे (रद्द करणे / मागे घेण असल्यास भरू नये)**
8. **माझी अशी काळजी घेऊ नये व असे वागवू नये (रद्द करणे / मागे घेण असल्यास भरू नये)**
9. **ऍलर्जी कोणताही इतिहास, ज्ञात दुष्परिणाम किंवा इतर वैद्यकीय समस्या:**
10. **मी खालील व्यक्तींना प्राधान्यक्रमानुसार (संलग्न फोटो आयडी आणि वयाचा पुरावा) , जे 18 वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत,मी माझ्या मानसिक आजारावरील उपचाराचे निर्णय घेण्यासाठी असमर्थ असताना ते निर्णय घेण्यासाठी माझे नामित प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले आहे (रद्द करणे / मागे घेण असल्यास भरू नये)**

**(a)नाव:** **वय:**

**वडिलांचे / आईचे नाव:**
**पत्ता:**

**संपर्क क्रमांक:**

**स्वाक्षरी:** **तारीख:**

**(b) नाव:** **वय:**

**वडिलांचे / आईचे नाव:**
**पत्ता:**

**संपर्क क्रमांक:**

**स्वाक्षरी:** **तारीख:**

*(नामित प्रतिनिधींची संख्या कितीही जोडली जाऊ शकते)*

**अर्जदाराची सही:** **तारीख:**

**11. . साक्षीदारांची सही:**

**श्री/सुश्री ________________________________________ एक करण्याची / दुरुस्ती / मागे / रद्द करण्याची मानसिक क्षमता आहे**

**हा फॉर्म स्वाक्षरीच्या वेळी आगाऊ सूचना आणि आमच्या स्वत: च्या स्वतंत्र इच्छेच्या उपस्थितीत त्यावर स्वाक्षरी केली.**

**साक्षीदार १: (नाव)** **(स्वाक्षरी)** **तारीख:**

**साक्षीदार 2: (नाव)** **(स्वाक्षरी)** **तारीख:**

**संलग्नक**


## नामनिर्देशित प्रतिनिधी (NR)

PwPDला त्यांच्या निवडीच्या कोणत्याही व्यक्तीची नामनिर्देशित प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार आहे. PwPD मानसिक आरोग्य सेवा आणि उपचार घेत असताना त्यांना आधार देणे हे अशा प्रतिनिधींचे कर्तव्य आहे. मानसिक आरोग्य सेवा कायद्यानुसार एखादी व्यक्ती कितीही नामनिर्देशित व्यक्ती नियुक्त करू शकते जोपर्यंत नामनिर्देशित प्रतिनिधी प्रौढ आहेत, त्यांच्या कर्त्यव्याचे पालन करण्यास सक्षम आहेत आणि लिखित संमती देतात.

PwPD ला त्यांचे स्वतःचे निर्णय घेण्यास समर्थन प्रदान करणे हे नामांकित प्रतिनिधीचे वैधानिक कार्य आहे. विशेषतः संबंधित उपचारांबाबत निर्णय घेण्यात समर्थन प्रदान करणे, रुग्णालयात समर्थित प्रवेश व बाहेर येणे, PWPD च्या निदान आणि उपचारांबद्दल माहिती मिळवणे, उपचार हक्कांच्या उल्लंघनांविरूद्ध एमएचआरबीकडे अर्ज करणे इ. तथापि, जर पीडब्ल्यूपीडी समर्थनासहसुद्धा स्वत: चे निर्णय घेण्यास असमर्थ असेल किंवा समर्थित (अनैच्छिक) प्रवेशाद्वारे रुग्णालयात उपचार घेत असेल , तर नामांकित प्रतिनिधींनी त्यांच्या वतीने निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा वेळी नामांकित व्यक्तींनी PWPD चा जीवन इतिहास, मूल्ये, मागील प्राधान्ये आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे

# समर्थित निर्णय पद्धतीची तत्वे

बरेच मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदाते असे मानतात की पीडब्ल्यूपीडी निर्णय घेणार नाहीत किंवा घेऊ शकत नाहीत. काही वेळा सेवा प्रदाता केवळ काळजीवाहुंशी संवाद साधून या विश्वासाला मजबुती देतात आणि अनावधानाने पीडब्ल्यूपीडीला त्यांच्या स्वत: च्या उपचारांबद्दल निर्णय घेण्यापासून परावृत्त करतात. या विभागात, आम्ही समर्थित निर्णयाची 5 तत्त्वे दिली आहेत जी मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदाता यांना त्यांच्या सेवेत अधिक तऱ्हेचे निर्णय समाविष्ट करण्यास मदत करू शकतात - अशाने पीडब्ल्यू पीडी स्वायत्तता वापरून त्यांच्या मानसिक आरोग्य सेवेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याची कौशल्ये विकसित करता येतात




**आकृती 4: समर्थित निर्णय पद्धतीची 5 तत्वे**

**तत्व १:** *समर्थनाची गरज असली तरीही प्रत्येकाला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे.* पीडब्ल्यूपीडीसह प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. ह्याचा अर्थ असा ना*ही की त्यांना समर्थना*ची आवशक्यता नाही, पण ह्याचा अर्थ असा आहे कि जरी त्यांना समर्थन आवश्यक असेल तरी आपल्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या गोष्टींमध्ये अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीचा आहे. मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांनी पीडब्ल्यूपीडी यांना त्यांच्या स्वत: च्या मानसिक आरोग्यसेवा आणि उपचारांचे निर्णय घेण्यासाठी सतत प्रोत्साहन आणि समर्थन दिले पाहिजे

**तत्त्व 2:** *एखाद्याची (निर्णय )क्षमता आहे हे गृहीत धरा आणि त्यांची प्राधान्ये विचारा*

प्रत्येक संभाव्य निर्णयासाठी, सेवा प्रदात्यांनी असे गृहित धरले पाहिजे की

PwPD यांनाक्षमता आहे, म्हणजेच PwPD निर्णयाशी संबंधित माहिती आणि त्याचे संभाव्य परिणाम समजू शकेल, त्यांचा निर्णय संप्रेक्षीत करू  शकेल, जरी त्यांना ह्यापैकी कुठल्याही किंवा सगळ्या पायऱ्यांवर समर्थनाची गरज पडली तरी निर्णय क्षमता ही निर्णय सापेक्ष आहे आणि कुठल्या  तऱ्हेचा निर्णय आहे ह्यावर भिन्न स्तरांच्या  समर्थनची गरज लागू  शकते.  सेवा प्रदात्यांनी वेगवेगळ्या उपचार पर्यायांचे - त्यामधील प्रत्येक पर्यायाशी निगडित फायदे आणि जोखीमी ह्याचे स्पष्टीकरण दिल्यानंतर पीडब्ल्यूपीडीला त्यांच्या प्राधान्याबद्दल  विचारले पाहिजे. उदाहरणार्थ जेव्हा pwpd ला मानसिक आजारावर कुठल्या तर्हेचे उपचार घ्यायचे हे ठरवण्यासाठी समर्थनाची गरज असेल तेव्हा सेवा प्रदात्याने त्याचे प्राधान्य विचारले पाहिजे - जसे तुम्हाला कोणते औषध घ्यायला आवडेल - ए की बी?  " किंवा "तुम्ही तोंडी औषधोपचार करण्यास प्राधान्य द्याल की ECT ला प्राधान्य द्याल?

**तत्त्व 3:** चुकीचे  किंवा वाईट निर्णय घेणे ठीक आहे आणि याचा अर्थ असा नाही की त्या व्यक्तीकडे निर्णय क्षमता कमी आहे

कोणत्याही व्यक्तीने चुका करणे  किंवा चुकीचे निर्णय घेणे स्वाभाविक आहे - हा एक निर्णय घेण्याचा आणि मानव असण्याचा अनुभव आहे. खरं तर आपण आपल्या चुकांमधून किंवा वाईट निर्णयांच्या अनुभवांमधून भविष्यातील निर्णय घेताना आपली निर्णय घेण्याची कौशल्ये सुधारू शकतो. लोकांना स्वतःचे निर्णय घेण्यापासून परावृत्त करणे त्यांना चुका करण्यापासून प्रतिबंधित करू शकते परंतु ह्यामुळे ते निर्णय कौशल्य सुधारण्याच्या संधीपासून सुद्धा वंचित होतात. केवळ चुका होतील किंवा वाईट निर्णय घेतले जातील म्हणून एखाद्याचा स्वनिर्णयाचा हक्क काढून घेणे हे न्याय्य नाही.

मानसिक आरोग्य सेवेच्या संदर्भात एखाद्या निर्णयाचे परिणाम जीवघेणे असू शकतात. अशा परिस्थितीत सेवा प्रदात्याने एखाद्या  विशिष्ट निर्णयाच्या  संभाव्य  धोक्यांबद्दल पूर्णपणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. जोपर्यंत पीडब्ल्यूपीडीला सादर केलेली माहिती आणि त्यांच्या निर्णयाचे संभाव्य परिणाम समजतात ,ते वाईट निर्णय घेण्यास किंवा उपचार पूर्णपणे नाकारण्यास मोकळे आहेत. बहुतेक निर्णयांचे परिणाम आपत्तीजनक नसतात. उदाहरणार्थ, दोन औषधांमध्ये  निवड करणे – पीडब्ल्यूपीडी ने कुठल्याही औषधोपचारास नकार दिला तरीही ते बहुदा जीवघेणे असू शकत नाही.  हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की क्षमता ही  प्रत्येक निर्णयावर अवलंबून असते आणि त्यामध्ये एखादा  वाईट निर्णय घेणे किंवा चूक करणे ह्यामुळे आपण व्यक्तीची निर्णय क्षमता काढून घेणे योग्य नाही.

**तत्व 4:** *लोकांना आपला विचार बदलण्याचा अधिकार आहे*

निर्णय घेताना चुका करणे याप्रमाणेच विचार बदलणे हा निर्णय घेण्याचा नेहमीच भाग आहे. लोक बरेचदा एखाद्या कृतीचा निर्णय घेतात परंतु नंतर दुसरा मार्ग निवडतात. कधीकधी लोक काहीतरी प्रयत्न करतात आणि मग त्यांना ती गोष्ट आवडत नाही हे ठरवतात. कधीकधी ते त्यांच्या निवडीबद्दल विचार करतात आणि प्रारंभिक निवड हा सर्वोत्तम पर्याय नव्हता हे ठरव तात. आपण आयुष्यात आपली मतं बदलत असतो आणि सेवा प्रदात्यांना हे माहित असले पाहिजे की पीडब्ल्यूपीडी देखील उपचारांच्या निर्णयासह विविध निर्णयांबद्दल त्यांचे मन बदलू शकतात. सेवा प्रदात्यांनी ह्या बदलालाही इतर कोणत्याही बदलाप्रमाणेच,  जोखीम, फायदे आणि कुठलेही संभाव्य परिणाम समजावून सांगत पाठिंबा द्यायला हवा

**तत्व 5:** *इतर लोक सहमत होणार नाहीत असे निर्णय लोक घेऊ शकतात.*

आयुष्यात बरेचदा आपण असे निर्णय घेतो की आपले कुटुंबीय, मित्र आणि आरोग्यव्यावसायिक त्याबरोबर सहमत नसतात कारण आपण स्वतःला आणि आपल्या परिस्थितीला सर्वोत्तम जाणतो. आपल्या वैयक्तिक मतास आणि पसंतीस विरोध असणारे निर्णय घेणे फार अवघड असते. अशा परिस्थितीत PwPD यांचे मानसिक आरोग्य व्यावसायिक किंवा सेवा प्रदात्याच्या माताविरूद्ध निर्णय घेत असताना अधिक गुंतागुंतिचे होऊ शकते.

प्रशिक्षणादरम्यान, सेवा प्रदात्यांना PwPD फक्त त्यांच्या शिफारसी आणि सल्ल्याचे अनुसरण करतील अशी समजूत करून दिली जाते. तथापि, सेवा प्रदात्यांनी हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे की PwPDमध्ये त्यांच्या कौशल्याएवढी समान पातळी नसली तरी त्यांना स्वायत्तता वापरून स्वतःच्या उपचार आणि काळजी निर्णयांमध्ये अधिक सहभागी व्हावेसे वाटू शकते. अशी उदाहरणांकडे सेवा प्रदात्यांनी पीडब्ल्यूपीडीची चिन्ह म्हणून स्वत: ची काळजी घेण्यात जास्त रस आणि त्यांना उपलब्ध असलेल्या पर्यायांबद्दल जाणून घेण्याची इच्छा दर्शविणारे चिन्ह म्हणून पहिले पाहिजे. काहीवेळा पीडब्ल्यूपीडी अखेरीस असे निर्णय घेऊ शकतात ह्याची शिफारस नसेल पण तरीही त्यांच्या निर्णयाचा आदर केला पाहिजे हे महत्वाचे आहे.

## SUMMARY

| | | |
|---|---|---|
| निर्णय घेण्यासाठी समर्थनाची आवश्यकता लागली किंवा निर्णयाशी इतर लोक सहमत नसतील, तरी प्रत्येकाला स्वतःचे निर्णय घेण्याचा हक्क आहे. | प्रत्येक निर्णयासाठी, सेवा प्रदात्याने पीडब्ल्यूपीडी कडे निर्णय क्षमता आहे असे गृहित धरावे आणि त्या विशिष्ट गोष्टीसाठी त्यांच्ये प्राधान्य विचारावे | समर्थित निर्णयामध्ये इतर कोणत्याही निर्णयाप्रमाणे कधीकधी चुका आणि वाईट निर्णय होतील , पण हा मानवी आयुष्याचा एक भाग आहे आणि ज्यामधून निर्णयक्षमतेचे कौशल्य सुधारू शकते. वाईट किंवा चुकीचे निर्णय घेतले म्हणून व्यक्तीकडे निर्णय क्षमतेची कमी आहे असा अर्थ होत नाही |

# समर्थित निर्णय घेण्यासाठी मानसिक स्वास्थ्य व्यावसायिक आणि सेवा प्रदाता यांनी अनुसरायचे धोरण

समर्थित निर्णय पद्धती विशेषत: भारतामध्ये बऱ्यापैकी नवीन दृष्टीकोन असल्यामुळे या मार्गदर्शकात मानसिक आरोग्य चिकित्सकाला आणि सेवा प्रदात्यांना पर्यायी निर्णय न घेता समर्थित निर्णय घेण्याचा अवलंब करायला मदत होईल अशा काही धोरणांची माहिती दिली आहे. खालील धोरण किंवा डावपेच दोघांनाही वापरता येतील परंतु ते परिस्थिनुरूप बदलावे लागतील

## धोरण १: शिक्षकाची भूमिका घ्या.

- स्वतःला समर्थित निर्णय पद्धती कडे वळवायचा एक सोपा मार्ग म्हणजे मानसिक आरोग्य व्यावसायिक किंवा सेवा प्रदाता PwPD साठी निर्णय घेण्याऐवजी स्वतःला शिक्षक मानून आपले अनुभव आणि कौशल्य पीडब्ल्यूपीडीला माहिती आणि शिक्षण देण्यासाठी वापरू शकतात
- मदतीची भूमिका घेताना निर्णय घेणार्यांचे स्वातंत्र्य प्रोत्साहित करणे, महत्त्वपूर्ण माहिती समजावणे आणि निर्णय घेणाऱ्यास त्यांच्या निवडीनुसार कार्य करण्यास मदत करणे महत्वाचे आहे. ..
- मदत करताना, प्रथम PwPD च्या भूमिकेतून विचार करा. आपण त्यांच्या परिस्थितीत असलो तर आपल्याला कोणत्या प्रकारची माहितीची गरज भासेल? आपण कोणाशी सल्लामसलत करू? आपल्याला कोणत्या प्रकारचे समर्थन लागेल? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यानंतर परत आपल्या भूमिकेतून त्या व्यक्तीला लागणारी माहिती मिळवून आणि समजावून माहितीपूर्ण निवड करण्यास मदत करा

## धोरण 3: विषय सोपे करा.

- पूजाच्या उदाहरणात सांगितल्या प्रमाणे कधी कधी एखाद्या गोष्टीचे स्पष्टीकरण देताना त्याला लहान, सोप्या चरणात विभाजित करणे हा एक सोपा मार्ग असतो.
- हे धोरण लेखी कागदपत्रांसाठी किंवा व्यक्तिशः समर्थानात वापरले जाऊ शकतात
- क्लिष्ट माहितीचे लहान आणि कमी भारदस्त युनिट्समध्ये विभागणे आणि त्यांचा उपयोग निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती देण्यासाठी करणे हे महत्त्वाचे आहे

## धोरण 3: सर्जनशील व्हा.

- काहीवेळा, माहिती लहान भागात विभाजित करूनही ती लोकांमध्ये पारंपरिक माध्यम वापरून वितरित करणे आव्हानात्मक असू शकते.
- अशा परिस्थितीत थोडीशी सर्जनशीलता नेहमीच उपयोगी पडते! उदाहरणार्थ, आपण काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहात हे व्यक्त करण्यासाठी चित्रकला किंवा कृती करून दाखविणे अशा साधनांचा वापर करू शकता. जेव्हा संप्रेक्षणाच्या पारंपरिक माध्यम अयशस्वी होतात तेव्हा सर्वात प्रभावी दुसरा मार्ग शोधावा लागतो.

## धोरण 4: भाषा बदला.

- बऱ्याचदा व्यावसायिक आणि उपचारांशी संबंधित कागदपत्रे तांत्रिक किंवा सामान्य माणसाला सहज न समजणाऱ्या भाषेत लिहून माहिती प्रदान केली जाते. त्यामुळे अशी कागदपत्रे सोप्या भाषेत पुन्हा लिहिण्याची किंवा अधिक मूलभूत संप्रेषणे वापरून माहिती पोहोचवण्याची शिफारस केली जाते.
- काहीवेळा सेवा प्रदात्यांद्वारे बोलल्या जाणाऱ्या भाषेची बोली PwPD ला समजू शकत नाही. PwPD आणि त्यांच्या काळजी घेणाऱ्यांना सहज समजेल अशा भाषेत माहिती सादर केली जाईल याची खात्री करणे महत्त्वाचे आहे.

## धोरण 5: स्पष्टीकरणासाठी वेळ द्या.

- विशेषत: कठीण असलेल्या गोष्टी समजण्याचा प्रयत्न करीत असताना केवळ स्पष्टीकरण ऐकण्यासाठीच नाही तर माहिती समजून घेण्यासाठी देखील बऱ्याचदा वेळ लागतो. समर्थित निर्णयाची प्रक्रिया आपल्यासाठी आणि पीडब्ल्यूपीडी साठी कमी त्रासाची करण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात वेळेची ी तरतूद करा
- इतरांना किंवा व्यावसायिकांना भेट देताना, PwPD ना काहीतरी समजून घेऊन त्यावर निर्णय घ्यायला अधिक वेळ लागू शकतो याची जाणीव करून द्या

## धोरण 6: स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांना प्रोत्साहन द्या.

- काहीवेळा जेव्हा आपण काळजीवाहूची भूमिका स्वीकारतो तेव्हा आपण काळजी घेत असणाऱ्या व्यक्तीला पुढाकार आणि जबाबदारी घ्यायला प्रोत्साहित कारण्याऐवजी त्या व्यक्तीच्या वतीने गोष्टी करायला सुरुवात करतो. ह्याचाा अर्थ असा नाही की ज्यांची काळजी घेण्यात येत आहे ते सर्व काही स्वतः करू शकतात, परंतु अशी काही कार्य ये आणि निर्णय आहेत जे विशेषतः काळजीवाहू आणि सेवापरदात्याच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्याच्या आधारे स्वतंत्रपणे केले आणि घेतले जाऊ शकतात, .
- सेवा प्रदात्यांना एक काळजी असते - जर PwPD नी घेतलेले स्वायत्त निर्णय वाईट असतील तर त्यासाठी सेवा प्रदात्याला जबाबदार धरले जाईल. इथे हे जाणून घेणे महत्वाचे आहे की सर्वजण - अगदी PWPD नी सुद्धा त्यांच्या स्वतःच्या निर्णयाची जबाबदारी घेतली पाहिजे. बहुतांशी निर्णयाचे परिणाम आपत्तीजनक नसतात. जसे काय परिधान करावे किंवा काय खावे आणि कधी झोपावे यासंबंधी निवडी जरी सर्वात योग्य नसतील तरी ते आपत्तीजनक नसतात .
- अधिक महत्त्वपूर्ण निर्णयांसाठी, सेवा प्रदाता सुरक्षित कवच ठेवू शकतात - जसे की PWPD च्या काळजीवाहू व्यक्तीला औषध कशा तऱ्हेने द्यायचे किंवा PWPD ला प्रश्न असतील तर कॉल करण्यासाठी फोने नंबर देणे वगैरे समजावून सांगावे इतर सुरक्षा कवचामध्ये PwPD ला सर्वसाधारणपणे औषधे घेण्यास भाग पाडले जाणार नाही परंतु त्या बदल्यात पीडब्ल्यूपीडी गंभीर लक्षणे जी व्यवस्थापित करण्यास ते असमर्थ असल्यास, शांत होण्याचे औषध घेण्यास संमती देतील अशा गोष्टींचा समावेश असू शकतो

कृपया लक्षात घ्या की अशा स्वरुपाचे कोणतेही करार लिखित स्वरूपात असावेत, पीडब्ल्यूपीडी आणि काळजीवाहकांे द्वारे समजले गेले असावेत आणि केवळ शेवटचा उपाय म्हणून वापरले जावेत जसे की त्या व्यक्तीच्या काळजीवाहकांना योग्यप्रकारे कसे करावे ते समजावून सांगा. जसे की संकटाच्या वेळासाठी कसे वागावे याची योजना तयार करणे किंवा PWPD ना आधी थोडे पैसे व्यवस्थापित करण्यास देऊन हळू हळू मोठ्या रकमेकडे प्रगती करणे .

## धोरण 7: समर्थक व्हा.

- काहीवेळा आपल्यालाा सेवा प्रदात्यापेक्षा जास्त एका समर्थकांची आवश्यकता असते - जोआपल्या अधिकारांचा आणि निवडीचा आदर करेल. आणि जो पाठीशीही उभा राहायला तयार आहे. ही भूमिका मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांसाठी अत्यंत महत्वाची आहे. कारण ते कौटुंबिक सदस्य, काळजीवाहू, इतर व्यावसायिक आणि समाज इत्यादींशी व्यवहार करतात, ज्यांना कदाचित समर्थित निर्णयपद्धतीची फारशी माहिती नाही
- का ही परिस्थितींमध्ये मानसिक आरोग्य व्यावसायिकांना किंवा सेवा प्रदात्यांना इतरांना सांगावे लागते की PWPD ना त्यांच्या निवडी स्वतंत्रपणे करण्याचा अधिकार आहे आणि त्यासाठी त्यांना अधिक वेळ लागू शकेल किंवा अधिक कष्ट घ्यावे लागतील. सेवा प्रदात्यांनी SDM ला समर्थन करणे आणि pwpd च्या स्वनिर्णयाच्या अधिकाराचे संरक्षण करणे आवश्यक आहे

***सारांश***

| | | |
|---|---|---|
| PWPD त्यांचे स्वतःचे निर्णय घेत आहेत आणि त्या निर्णयांना समर्थन आणि आदर आहे याची खात्री करण्यासाठी मानसिक आरोग्य व्यवसायिक आणि सेवा प्रदाते विविध धोरणे वापरू शकतात<br><br>. | इथे दिलेली ७ धोरणे हि ण संपूर्ण यादी नाही पण मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांना पर्यायी निर्णयापासून समर्थित निर्णयाकडे संक्रमण करायला मदत करू शकतात | ही सात विविध संदर्भात किंवा संयोजनात PWPD च्या वैयक्तिक गरजेनुसार वापरता येतात |

# व्यवहारात समर्थित निर्णय घेणे

भारताचे सांस्कृतिक संदर्भ आणि वास्तविक सत्य लक्षात घेता, आरोग्यसेवा आणि उपचार-संबंधित निर्णय हे समर्थित निर्णयाचा वापर करण्यासाठी एक जटिल क्षेत्र वाटू शकतात. डॉक्टर आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांना सत्तेच्या परिस्थितीत समजले जाते. परिणामी लोकांना अधिक तपशीलवार स्पष्टीकरण विचारणे किंवा शिफारस केल्यापेक्षा वेगळा उपचार पर्याय निवडणे ह्याबद्दल अनेकदा अस्वस्थता वाटते. उपचारांशी संबंधित निर्णय घेणे जीवनातील इतर निर्णय घेण्याच्या तुलनेत अधिक क्लिष्ट असू शकते, कारण ते सहसा आरोग्यसेवा व्यावसायिकांचे मत, विशेष आणि तांत्रिक माहिती, कौटुंबिक वैद्यकीय इतिहास, वैयक्तिक आरोग्य समस्या ह्या व इतर विविध घटकांवर अवलंबून असतात

तथापि, इतर कोणत्याही निर्णयाप्रमाणेच , लोक उपचार पर्याय निवडतानाही त्यांच्या प्राधान्यानुसार निर्णय घेतात. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती दररोज औषधे (तोंडी) घेण्याची निवड करू शकते तर दुसरी व्यक्ती मासिक इंजेक्शन घेणे निवडू शकते. शिवाय, लोकांना आरोग्य सेवक किंवा काही ठराविक सेवा निवडण्याबद्दल प्राधान्य असू शकते. व्यावसायिक आणि सेवा ज्यामध्ये ते प्रवेश करू इच्छितात. हे PwPD साठी तितकेच खरे आहे. समर्थित निर्णय घेण्याची विवध माध्यमे आहेत जी त्यांना मदत करू शकतात - जसे आगाऊ निर्देश किंवा विश्वासार्ह व्यक्तीकडून समर्थन .

.

## आव्हानात्मक परिस्थिती

काही परिस्थितींमध्ये, विशेषत: संकट परिस्थितीत समर्थित निर्णय पद्धतीची सोय करणे हे आव्हानात्मक असू शकते , खासकरुन जेव्हा त्या व्यक्तीकडून स्वत:ला किंवा इतरांना धोका असतो. तथापि, त्या व्यक्तीच्या अधिकारांचा आदर केला जाईल ह्याची खात्री करण्यासाठी नेहमीच काही पावले उचलता येतील. जेव्हा संकटाचा सामना करावा लागतो तेव्हा कोणत्याही हस्तक्षेपाची पहिली पायरी म्हणजे त्या व्यक्तीस नेहमी मदतीसाठी काय केले जाऊ शकते असे विचारावे. त्या व्यक्तीच्या भावनांचा आदर करणे आणि त्याची पोचपावती देणे ह्याची परिस्थिती निवळायला बरीच मदत होऊ शकते.

उदाहरणार्थ, जसे की खालील वाक्ये वापरणे:

- "हॅलो रीत , माझे नाव डॉ अंशू आहे. मी येथे क्लिनिकमध्ये मनोचिकित्सक आहे. आपण याक्षणी खूप अस्वस्थ आहात, मी मदत करण्यासाठी काही करू शकतो का? "
- "हॅलो, माझे नाव सोमा आहे. मी इकडे इस्पितळात एक परिचारिका आहे . मी इथे तुला आधी पाहिले आहे पण याक्षणी आपण अस्वस्थ वाटत आहात . मी मदत करण्यासाठी काही्ी करू शकतो? "

काही पीडब्ल्यूपीडीला औषधे हवी असतील, परंतु इतरांना शांत (निर्जन नाही ) खोलीत राहावेसे वाटेल किंवा कुटूंबातील एखादा सदस्य उपस्थित असावा असे वाटू शकेल. एखाद्याला फक्त दुसऱ्या कोणीतरी आपण का अस्वस्थ आहोत हे ऐकावे एवढेच हवे असेल . जर एखादी व्यक्ती प्रतिसाद देत नसेल किंवा अशा प्रकारे े उत्तर देत असेल जे आपल्याला समजत नाही किंवा कोणत्याही प्रकारच्या मदतीस नकार देत असेल तर त्यांना शांत व्हायला थोडा वेळ द्या

जर ती व्यक्ती चिडली असेल किंवा ती आक्रमक होण्याची शक्यता असेल तर इतर लोकांना त्या परिसरापासून दूर जाण्यासाठी निर्देशित करा. ही संकटाची वेळ पार पडेपर्यंत दर पाच मिनिटांनी त्या व्यक्तीला कशाची गरज आहे का हे तपासा. एकदा संकट संपल्यावर त्या व्यक्तीबरोबर संकटाविषयी बोला आणि विशिष्ट तात्कालिक कारण किंवा अशी परिस्थिती परत कधी उद्भवू शकते हे सांगण्यासाठी चिन्हे असल्यास ते समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्या व्यक्तीबरोबर अशा परिस्थितून मुक्त होण्यासाठी आगाऊ निर्देश योजना किंवा मसुदा बनवा जो त्या व्यक्तीच्या रागाला कारणीभूत

असणारी तात्कालिक करणे आणि अशा परिस्थित  उपचारांची प्राधान्ये याची माहीती देईल. अशा परिस्थितीत तुम्ही त्यांच्या हक्कांची त्यांना पूर्ण माहिती दिली असल्याची खात्री करा.

जर ती व्यक्ती स्वत: ला इजा करीत असेल किंवा अशा तऱ्हेने वागत असेल ज्यातून त्यांच्या स्वतःच्या किंवा इतरांच्या आयुष्य आणि सुरक्षा ह्यांना  धोका असेल, तर त्यांना मानसिक स्वास्थ्य व्यावसायिक किंवा काळजीवाहू म्हणून समजावून सांगा की आपण त्यांना स्वत: चे किंवा इतरांचे नुकसान करु देऊ शकत नाही.

त्यांची वागणूक अशीच चालू राहिल्यास आपल्याला हस्तक्षेप करणे भाग होईल हे त्यांनां समजावून सांगा. त्यामध्ये कोणती पावले उचलली जाऊ शकतात हेही त्यांना समजवा.  उदाहरणार्थ:  "तू भिंतीवर डोके आपटतो आहेस, आणि मला अशी काळजी आहे की तूला  ततून दुखापत होईल. एक डॉक्टर / नर्स म्हणून, तुला मदत करणे हे माझे काम आहे. तू हेच चालू ठेवलेस तर मला हस्तक्षेप करणे  बांधील होईल . मला तुम्हाहला शारीरिकरित्या भीतीपासून दूर हलवायला लागेल. जर तुम्ही आक्रमक झालात तर माझे सहकारीदेखील हस्तक्षेप करतील आणि आम्हाला सक्तीने औषधोपचार करावा लागू शकतो. मला असे करण्याची इच्छा नाही आणि मी आपल्याला कृपया येथे बसायची विनंती करतो. मी काय म्हणतोय हे आपल्याला कळतंय का? "

एकदा संकट निवळले की  त्या व्यक्तीशी बोला आणि आपण कुठली पावले आणि का घेतली  हे त्यांना समजावून सांगा. मग त्या व्यक्तीबरोबर अशा परिस्थिती तून मुक्त होण्यासाठी त्या व्यक्तीच्या प्राधान्यानुसार आगाऊ निर्देश किंवा पुनर्प्राप्ती मसुदा तयार करा जो भविष्यात संकट आल्यास उपचार करण्यासाठी वापरण्यात येईल.

मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांनी PWPD ना संकट किंवा आणीबाणीच्या परिस्थितीत समर्थन प्रदान करताना मेंटल हेल्थकेअर ॲक्ट,२०१७ मधील तरतुदींचे पालन केले पाहिजे त्यांनी याची खात्री केली पाहिजे की प्रदान केलेले उपचार किंवा पाठिंबा कोणत्याही कायदेशीर सुरक्षा कवचाचे  उल्लंघन करत नाही

## मानसिक आरोग्य सेवेच्या संदर्भात समर्थित निर्णय घेणे

मानसिक आरोग्य व्यावसायिक आणि सेवा प्रदात्यांना समर्थिती निर्णय पद्धती लागू करण्यासाठी, भिन्न व्यावहारिक पध्दती स्पष्ट करण्यासाठी खाली काही वास्तविक जीवनातील उदाहरणे दिली आहेत. ही उदाहरणे मागील विभागामध्ये स्पष्ट केलेल्या समर्थित निर्णयपद्धतीच्या तत्त्वे आणि धोरणांवर आधारित आहेत.

या उदाहरणांमध्ये आम्ही मेहुल अशा गंभीर मानसिक आरोग्य समस्या असणाऱ्या एका काल्पनिक व्यक्तीचा उल्लेख करू. जरी पीडब्ल्यूपीडी बरेचदा त्यांची काही गंभीर लक्षणे सुद्धा व्यवस्थापित करू शकतात पण /फक्त खाली दिलेल्या काही उदाहरणांत मेहुलला गंभीर लक्षणे आणि त्याच्या सेवेसाठी उच्च स्तराची समर्थन आवश्यक असल्याचे दाखवले गेले आहे.

**परिस्थिती 1:** मेहुलला नुकतेच स्किझोफ्रेनिया झाल्याचे निदान झाले आहे. त्याच्या इतर वैद्यकीय परिस्थिती, ॲलर्जी आणि कौटुंबिक इतिहास पाहता, उपचाराचे तीन संभाव्य पर्याय आहेत: A, B, आणि C.

## तुम्ही काय करायला हवे?

SDM समर्थित निर्णय पद्धतीचा वापर करून, सेवा प्रदाता आणि काळजीवाहू दोघांनाही मेहुलला स्वत: उपचाराचा संभाव्य पर्याय निवडण्याची संधी आणि प्रोत्साहन द्यावे लागेल (तत्त्व 1).

सेवा प्रदात्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की मेहुल दुसरी उपचारापद्धती निवडू शकतो, ज्या बरोबर सेवा प्रदाता सहमत नाही किंवा उपचार नाकारू शकतो.

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ स्किझोफ्रेनिया म्हणजे काय आणि त्याचा त्याच्या जीवनावर कसा परिणाम होतो हे मेहुलला समजावून सांगा. तसेच उपलब्ध असलेल्या तीन उपचार पर्यायांचे स्पष्टीकरण द्या, ज्यात प्रत्येकाचे धोके आणि फायदे समाविष्ट आहेत (नीती 1 मेहुलने प्रत्येक निवडीबद्दल आणि संभाव्य धोक्यांची सर्व माहिती गोळा करून णि समजून घेतल्यानंतर उपचाराचा पर्याय स्वतंत्रपणे निवडण्यासाठी त्याला प्रोत्साहन द्या (नीती 6).
- ✓ मेहुलच्या निर्णयाचा घरात आदर केला जाईल तसेच त्याच्या गंभीर मानसिक आरोग्याच्या समस्येमुळे त्याच्या क्षमतेवर शंका घेऊ शकतील अशा इतर कोणत्याही व्यक्तींसोबत मेहूलच्या निर्णयक्षमतेबद्दल आग्रह धरा (नीती 7).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला कोणत्या उपचारांचा अवलंब करावा हे सांगणे किंवा फक्त सेवा प्रदात्याने शिफारस केलेले पर्याय स्पष्ट करणे.
- ☒ मेहुलला त्याचे सर्व पर्याय स्पष्ट न करता, विशिष्ट उपचारांचा कोर्स करण्यास प्रवृत्त करणे.
- ☒ मेहुलच्या सूचित संमतीशिवाय कोणतेही उपचार करणे.

**परिस्थिती 2:** मेहुल त्याच्या प्राथमिक काळजीवाहकासह एका चिकित्सालयात पोहोचतो. तो अव्यवस्थित आहे, अस्वस्थ झालेला दिसतो आणि काहीतरी पुटपुटत आहे . काळजीवाहक स्वागत कक्षातील परिचारिकेला सांगतो की त्याला शांत होण्यासाठी औषधांची गरज आहे आणि मेहुलच्या वतीने संमती देण्याची तयारी दर्शवतो

## तुम्ही काय करायला हवे?

✤ समर्थित निर्णय पद्धतीचा वापर करून, मेहुलच्या सेवा प्रदात्यांनी असे गृहीत धरले पाहिजे की औषध घ्यायचे की नाही याचा निर्णय घेण्याची क्षमता मेहुलमध्ये आहे. शिवाय, सेवा प्रदात्याने त्याला विचारले पाहिजे की त्याचे प्राधान्य काय आहे, उदाहरणार्थ इंजेक्शन किंवा तोंडी औषधे आणि कोणती औषधे (तत्त्व 2).

✤ सेवा प्रदात्यांनी मेहुलला कोणतेही औषध नाकारण्याचा संभाव्य वाईट निर्णय घेण्याची संधी दिली पाहिजे - हे शक्य आहे की मेहुल अधिक अस्वस्थ किंवा आक्रमक होईल, परंतु जोपर्यंत त्याच्या अधिकारांमुळे इतरांच्या अधिकारांचे उल्लंघन होत नाही, (म्हणजे, तो एखाद्याला शारीरिक इजा करत नाही) , तोपर्यंत त्याच्या निर्णयांचा आदर केला पाहिजे (तत्त्व 3).

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलला विचारा की तुम्ही त्याला कशी मदत करू शकता आणि संभाव्य उपचार पर्याय स्पष्ट करण्याची तयारी दर्शवा (नीती 1).
- ✓ समुपदेशन किंवा औषधोपचार असे उपलब्ध असणारे पर्याय आणि सेवा स्पष्ट करा (रणनीती 5).
- ✓ मेहुलला उपचाराबाबत जरी काळजीवाहकाने संमती दिली तरी त्याला स्वतःचा निर्णय घेण्यास प्रोत्साहित करा. (रणनीती 6)).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला रोखणे किंवा एकांतात ठेवणे .
- ☒ मेहुलला त्याच्या सूचित संमतीशिवाय कोणतेही औषध किंवा उपचार देणे
- ☒ काळजीवाहकाला मेहुलच्या वतीने कोणत्याही उपचारासाठी संमती देण्याची परवानगी देणे.

**परिस्थिती 3:** मेहुल दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या डे केअर सेंटरमध्ये काम करून माफक पगार मिळवतो आणि सामान्यतः पैशांच्या व्यवस्थापनासह आर्थिक मदतीसाठी त्याच्या काळजीवाहूंवर अवलंबून असतो. मेहुल जे काही पैसे कमवतो, ते त्याच्या काळजीवाहकांना देतो जे नंतर मेहुलच्या वतीने कपडे, अन्न इत्यादी खरेदी करतात. मेहुलने पूर्वी त्याच्या काळजीवाहकांना सांगितले होते की त्याला ही व्यवस्था आवडली आहे, परंतु अलीकडेच त्याने विचारले आहे की तो स्वतःचे काही पैसे आणि वित्त व्यवस्थापित करू शकतो का.

## तुम्ही काय करायला हवे?

- SDM चा वापर करून, मेहुलच्या काळजीवाहकांनी असे गृहीत धरले पाहिजे की मेहुल आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम आहे. त्याला कोणत्या आर्थिक बाबींवर अधिक नियंत्रण ठेवायचे आहे आणि असे करताना त्याला त्याच्या काळजीवाहू किंवा इतरांकडून कोणती मदत आवश्यक आहे हे विचारले पाहिजे (तत्त्वे 1 आणि 2) ).
- सध्याच्या आर्थिक व्यवस्थेवर आनंदी असूनही, मेहुलच्या काळजीवाहकांनी मेहुलला असे करायचे असल्यास त्याला सध्याच्या व्यवस्थेबद्दल त्याचे मत बदलण्यास प्रोत्साहित केले पाहिजे (तत्त्व 4).

### काळजीवाहूने हे करावे

✓ मेहुलशी आर्थिक व्यवस्थापन, गुंतवणूक अशा विविध बाबींमध्ये सर्वोत्तम सहाय्य कसे करावे याबद्दल संभाषण करा (रणनीती 1).

✓ मेहुलला आर्थिक व्यवस्थापन समजण्यास आणि इतर आवश्यक कौशल्ये शिकण्यास मदत करण्यासाठी किराणा सामानासाठी पैसे देणे किंवा बँक खाते उघडणे यासारख्या गोष्टींचा सराव करा (रणनीती 3).

✓ कोणत्याही संबंधित आर्थिक कागदपत्रांची भाषा मेहुलला समजेल अशा पद्धतीने सोपी करून समजावून सांगा (रणनीती 4).

### काळजीवाहूने हे करू नये

☒ मेहुलला सांगणे की तो सध्याच्या आर्थिक व्यवस्थेवर खूश असावा.

☒ मेहुल आर्थिक बाबी हाताळण्यास किंवा पैशाचे व्यवस्थापन करण्यास असमर्थ आहे असे गृहीत धरणे

☒ मेहुलला माहिती पूर्णपणे समजून घेण्यासाठी वेळ आणि सर्जनशीलता लागली तरी आर्थिक व्यवस्थापनाच्या विविध पैलूंचे स्पष्टीकरण देणे सोडून देणे

परिस्थिती **4:** मेहुलने त्याच्या काळजीवाहू व्यक्तीला सांगितले आहे की अपंग व्यक्तींसाठी डे केअर सेंटरमध्ये काम करण्याऐवजी त्याला समाजात नोकरी करायला आवडेल. मेहुलला माहित आहे की त्याचा काळजीवाहक त्याला पर्यायी रोजगार शोधण्यास मान्यता देणार नाही, कारण त्याला वाटते की मेहुल नियोक्त्यांची चुकीची निवड करेल आणि नोकरीमध्ये चुका करेल.

## तुम्ही काय करायला हवे?

- SDM चा वापर करून, काळजीवाहकांनी मेहुलला हा निर्णय घेण्याची संधी आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, जरी त्याने अशी नोकरी निवडली की  ज्यामुळे त्याला ताण येतो आणि तो एक कर्मचारी म्हणून चुका करतो (तत्त्व 3).
- काळजी घेणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की मेहुल समाजात नोकरी शोधण्याच्या निर्णयासह (तत्त्व 5) त्यांना मान्य नसलेले निर्णय घेऊ शकतो.

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलला कुठे काम करायला आवडेल, त्याच्याकडे कोणती कौशल्ये आहेत, त्याला कोणत्या आवडेल, अशा छोट्या भागांमध्ये काम करण्यासाठी लागणाऱ्या निर्णयांचे विभाजन करा. (रणनीती 2).
- ✓ मेहुलला स्वतंत्र राहण्यासाठी, कामावर जाण्यासाठी आणि तेथून स्वतःची वाहतूक शोधण्यासाठी, कामासाठी योग्य कपडे निवडण्यासाठी आणि त्याचा पगार व्यवस्थापित करण्यासाठी प्रोत्साहित करा (रणनीती 6).
- ✓ घरी मेहूलच्या निर्णयाचा आदर केला जाईल यासाठी तसेच त्याच्या अपंगत्वामुळे त्याच्या क्षमतेवर शंका घेणाऱ्या त्याच्या संभाव्य नियोक्त्यांसोबत त्याचे समर्थन करा (रणनीती 7).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला सांगणे की तो समाजात काम करू शकत नाही.
- ☒ मेहुलला अशा ठिकाणी काम करण्यास प्रवृत्त करणे  जे काळजीवाहूना  "सुरक्षित" समजतात.
- ☒ मेहुल सुरुवातीला नोकरी शोधण्यात यशस्वी न झाल्यास त्याला इतर संधी शोधण्यापासून परावृत्त करणे

**Situation 5:** मेहुलला त्याच्या मित्रांसोबत चित्रपट पाहायला जायला आवडेल. शेवटच्या वेळी तो गर्दीच्या ठिकाणी होता तेव्हा तो खूप चिंताग्रस्त आणि अस्वस्थ झाला होता. त्याच्या काळजीवाहकाला काळजी वाटते की तो चित्रपटासाठी गेला तर त्याला पुन्हा असाच अनुभव येऊ शकतो.

## तुम्ही काय करायला हवे?

- SDM वापरून, मेहुलच्या काळजीवाहूंनी हे समजून घेतले पाहिजे की मेहुलला त्याच्या मित्रांसोबत चित्रपट पहायचा की नाही याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे, जरी हा निर्णय पूर्ण करण्यासाठी काही नियोजन आणि समर्थन आवश्यक असेल (तत्त्व 1).

- B समजून घेणे की जरी मेहुल मित्रांसोबत बाहेर गेला तर तो नंतर चित्रपट संपण्यापूर्वी घरी परत यायचा निर्णय घेऊ शकतो (तत्त्व 4).

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलसोबत एक सुरक्षा योजना तयार करा जी त्याला चिंताग्रस्त वाटत असताना त्याची प्राधान्ये व्यक्त करतील, जसे की त्याच्या सेवा प्रदात्याला कॉल करणे किंवा त्याला घरी परतण्यास मदत करणारा मित्र असणे (रणनीती 3).
- ✓ मेहुलला चिंता समजावून सांगण्यासाठी वेळ द्या आणि मेहुलला अडचणी आल्यास त्याला सुरक्षा योजना समजली आहे याची खात्री करा (रणनीती 5).
- ✓ मेहुलला त्याच्या मित्रांसोबत चित्रपट पाहण्यासाठी आणि त्याच्या सुरक्षा योजनेची मालकी घेण्यासाठी प्रोत्साहित करा (रणनीती 6).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला सांगणे की तो चित्रपटाला जाऊ शकत नाही.
- ☒ मेहुलच्या मित्रांना पटवून देणे की तो अस्वस्थ असल्याने मित्रांसोबत चित्रपटासाठी बाहेर जाऊ शकत नाही
- ☒ मेहुलला फक्त त्याच्या मित्रांसोबत जायला आवडत असेल तरी त्याच्यासोबत चित्रपटाला जाणे .

**Situation 6:** मेहुलच्या काळजीवाहूंना मेहुलने लग्न करावे असे वाटते.

## तुम्ही काय करायला हवे?

- SDM वापरून, मेहुलच्या काळजीवाहकांनी असे गृहीत धरले पाहिजे की मेहुलला लग्न करायचे आहे की नाही हे ठरवण्याची क्षमता आहे आणि त्याला कोणाशी लग्न करायचे आहे हे विचारले पाहिजे (तत्त्व 2).
- मेहुलला स्वतःचा जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे, जरी त्याच्या काळजीवाहकांनी जोडीदाराला नापसंती दर्शवली किंवा लग्न न करण्याचा निर्णय घेण्याचा हक्क आहे (तत्त्व 5).

### ✓ काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलला विचारा की त्याला लग्न करायचे आहे का, लग्न करण्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजू स्पष्ट करा (नीती 1).
- ✓ मेहुलला स्वतःचा निर्णय घेण्यास प्रोत्साहित करा आणि जर त्याने लग्न करण्याचा निर्णय घेतला, तर त्याला जोडीदाराच्या योग्य जबाबदाऱ्या घेण्यास प्रोत्साहित करा (रणनीती 7).
- ✓ मेहुलला योग्य जोडीदार शोधण्यात मदत करा (रणनीती 3).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला सांगणे की त्याचे लग्न झालेच पाहिजे.
- ☒ मेहुलला सांगणे की कोणाशी लग्न करायचे किंवा कोणता जोडीदार निवडायचा.
- ☒ मेहुलची इच्छा आणि पसंती विचारात न घेता किंवा त्याची संमती न घेता त्याचे लग्न करणे .

**Situation 7:** मेहुलला अस्वस्थ वाटत आहे आणि तो त्याच्या काळजीवाहकांना सांगतो की त्याला हॉस्पिटलमध्ये जायचे आहे. विशिष्ट कालावधीसाठी निर्णय घेण्यास सक्षम नसताना मेहुलने त्याच्या उपचारांची प्राधान्ये व्यक्त करून आगाऊ निर्देश लिहिले आहेत. त्याच्या आगाऊ निर्देशात, तो निर्दिष्ट करतो की एखाद्या संकटाच्या वेळी तो हॉस्पिटल B मध्ये न जाता हॉस्पिटल A मध्ये नेणे पसंत करेल.

## तुम्ही काय करायला हवे?

- SDM चा वापर करून, मेहुलच्या काळजीवाहकांनी असे गृहीत धरले पाहिजे की आजारी असूनही, मेहुलला उपचार करायचे आहेत की नाही हे ठरवण्याची क्षमता आहे (तत्त्व 2).
- मेहुलच्या काळजीवाहकांनी हॉस्पिटल A ऐवजी हॉस्पिटल B मध्ये उपचार घेण्याच्या त्याच्या निवडीचा आदर केला पाहिजे, जरी त्याचे काळजीवाहक हॉस्पिटल A ला प्राधान्य देत असतील (तत्त्व 5).

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलला विचारा की त्याला हॉस्पिटल A किंवा हॉस्पिटल B मध्ये जायचे आहे. जर तो त्याची पसंती व्यक्त करू शकत नसेल, तर आगाऊ निर्देशाचे पालन करा (रणनीती 1).
- ✓ मेहुलला त्याच्या पसंतीच्या उपचारांची निवड व्यक्त करण्यास प्रोत्साहित करा आणि त्याला नको असलेल्या उपचार पर्यायांचा विचार करा (रणनीती 3 आणि 4).
- ✓ मेहुलची इच्छा असल्यास संकटाच्या तयारीसाठी आगाऊ निर्देश तयार करण्यात मदत करा आणि संकटाच्या वेळी त्याचे पर्याय समजण्यास मदत करा (रणनीती 5).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला हॉस्पिटल A मध्ये घेऊन जाणे जेव्हा त्याने व्यक्त केले असेल की त्याला हॉस्पिटल B पसंत आहे.
- ☒ मेहुलचे आगाऊ निर्देश घरी ठेवणे ( एक प्रत रुग्णालयात न आणणे )
- ☒ गृहीत धरणे की मेहुल यापुढे संकटाच्या कालावधीसाठी निर्णय घेऊ शकणार नाही

**Situation 8:** मेहुलच्या आगाऊ निर्देशात असे म्हटले आहे की कोणतेही औषध घेण्यापूर्वी तो त्याच्या डॉक्टरांना भेटण्यास प्राधान्य देईल आणि त्याच्या काळजीवाहकांना (जे त्याचे विश्वासू व्यक्ती आहेत) मेहुलला औषध मिळावे असे वाटत असल्यास, मेहुलने काही औषधांसाठी त्याची प्राधान्ये सूचीबद्ध केली आहेत. एकदा हॉस्पिटलमध्ये, वेटिंग रूममध्ये मेहुल खूप अस्वस्थ होतो आणि हॉस्पिटलचे कर्मचारी काळजीवाहकांना सांगतात की त्यांना मेहुलला शांत करणारे औषध देण्यास त्यांची संमती हवी आहे.

## तुम्ही काय करायला हवे?

- मेहुलच्या काळजीवाहूंनी हे लक्षात ठेवले पाहिजे की मेहुलला संकटाच्या परिस्थितीतही निर्णय घेण्याचा अधिकार आहे, जरी त्याला त्याचे पर्याय समजून घेण्यासाठी आणि त्या काळात निवडीवर कार्य करण्यासाठी त्याच्या काळजीवाहकांकडून अधिक समर्थनाची आवश्यकता असू शकते (तत्त्व 1).
- मेहुल त्याच्या आगाऊ निर्देशांद्वारे निर्णय घेऊ शकतो किंवा प्राधान्ये व्यक्त करू शकतो ज्या बरोबर कदाचित त्याचे काळजीवाहक आणि प्रदाते सहमत नसतील; तरीसुद्धा, त्याच्या इच्छेचा आणि प्राधान्यांचा आदर केला पाहिजे (तत्त्व 5).

### काळजीवाहूने हे करावे

- ✓ मेहुलला विचारा की त्याच्या डॉक्टरांची वाट पाहत असताना त्याला शांत होण्यास कोणत्या गोष्टी मदत करू शकतात, जसे की शांत खोलीत जाणे किंवा संगीत ऐकणे (रणनीती 3).
- ✓ कोणतीही औषधे घेण्यापूर्वी मेहुल त्याच्या डॉक्टरांना भेटू शकेल असा आग्रह धरा (रणनीती 6).
- ✓ हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांना समजावून सांगा की मेहुलकडे आगाऊ निर्देश आहेत आणि त्यांना एक प्रत प्रदान करा (रणनीती 5).

### काळजीवाहूने हे करू नये

- ☒ मेहुलला त्याची प्राधान्ये व्यक्त करता येत असल्यास आणि/किंवा त्याने आगाऊ निर्देश दिले असल्यास त्याच्यासाठी उपचाराचे निर्णय घेणे
- ☒ कोणत्याही उपचारासाठी मेहुलच्या वतीने सूचित संमती प्रदान करणे जोपर्यंत त्याने निर्दिष्ट केले नाही की संकटाच्या परिस्थितीत तुम्ही असे करू शकता.
- ☒ सेवा प्रदात्यांना मेहुलच्या आगाऊ निर्देशामध्ये नमूद केलेल्या उपचार प्राधान्यांकडे दुर्लक्ष करू देणे किंवा त्याच्या सूचित संमतीशिवाय उपचार देणे .

## References


1. Convention on the Rights of Persons with Disabilities, Dec. 13, 2006, 2515 U.N.T.S.3.
2. Committee on the Rights of Persons with Disabilities, United Nations, General Comment on Article 12: Equal Recognition Before the Law, Nov. 25, 2013, CRPD/C/11/4.
3. Disability Services, Department of Human Services, State Government Victoria, Supported Decision-Making: A Guide to Supporting People with a Disability to Make Their Own Decisions (2012).
4. Inclusion Europe, Choices: A Platform on Supported Decision-Making, http://www.right-to-decide.eu/ (last visited Jan. 20, 2015).
5. Mental Disability Advocacy Center, Supported Decision-Making: An Alternative to Guardianship, Policy Paper 4 (2010).
6. Michael Bach and Lana Kerzner, Law Commission of Ontario, A New Paradigm for Protecting Autonomy and the Right to Legal Capacity (2010).
7. Ministry of Health & Family Welfare, Government of India, New Pathways New Hope: National Mental Health Policy of India (2014).
8. Mental Healthcare Act, 2017: https://egazette.nic.in/WriteReadData/2017/175248.pdf